◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION UNDER PROCESS
Application No. T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN 24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 20 नवम्बर 2026

अपराध

चंद्रपूरमध्ये पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांचा गुन्हेगारांविरुद्ध सर्जिकल स्ट्राईक, ५४ आरोपींवर मोक्का कारवाई



चंद्रपूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक आयुष नोपानी यांच्या नेतृत्वाखाली आक्रमक कारवाई करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, जिल्ह्यातील ५४ आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम (मोक्का) अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. त्याचबरोबर ९८ सराईत गुन्हेगारांना जिल्ह्यातून तडीपार करण्यात आले, ज्यामुळे गुन्हेगारी जगताला मोठा धक्का बसला. या कठोर कारवाईमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना बळकट होण्याची अपेक्षा आहे आणि गुन्हेगारांवर पोलिसांचा धाक निर्माण झाला आहे. पोलीस प्रशासनाचा स्पष्ट संदेश – चंद्रपूर जिल्ह्यात गुंडगिरी, दहशत आणि गुन्हेगारीला कोणत्याही परिस्थितीत थारा दिला जाणार नाही.

— DOCTOR PINTU PAUL

राजनीति

ठाणे जिल्ह्याला दुष्काळाच्या यादीतून वगळले; मुरबाड, शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा.



ठाणे जिल्ह्याला दुष्काळाच्या यादीतून वगळले; मुरबाड, शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा

शेजारील पालघर जिल्ह्यातील तालुक्यांचा समावेश, मात्र ठाणे जिल्ह्यावर अन्याय झाल्याची बळीराजाची भावना

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

विशेष दुष्काळ मागणी वार्ता पत्र

मुरबाड / ठाणे :दिनांक २०/११/२०२६.

राज्य शासनाने यापूर्वी जाहीर केलेल्या ३०४ दुष्काळी तालुक्यांव्यतिरिक्त राज्यातील आणखी ६ तालुके दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले आहेत. त्यामुळे राज्यातील एकूण दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या ३१० वर पोहोचली आहे. मात्र, या सुधारित यादीतूनही ठाणे जिल्ह्याला पूर्णपणे वगळण्यात आल्याने जिल्ह्यातील कृषीप्रधान असलेल्या मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र निराशा पसरली आहे.

शासनाच्या नव्या निर्णयानुसार नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी, रत्नागिरीतील चिपळूण, कोल्हापूरमधील हातकणंगले व गडहिंग्लज तसेच ठाणे जिल्ह्याला लागून असलेल्या पालघर जिल्ह्यातील वाडा आणि विक्रमगड या तालुक्यांचा दुष्काळग्रस्त यादीत समावेश करण्यात आला आहे. शेजारील पालघर जिल्ह्यातील वाडा आणि विक्रमगड या तालुक्यांना दुष्काळी सवलतींचा लाभ मिळणार असताना, सारखीच भौगोलिक परिस्थिती आणि शेतीचे नुकसान सोसणाऱ्या मुरबाड व शहापूर तालुक्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याची भावना स्थानिक शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

दुष्काळग्रस्त घोषित झालेल्या ३१० तालुक्यांमध्ये शासनाकडून विविध सवलती लागू करण्यात आल्या आहेत. यामध्ये जमीन महसुलात सूट, पीककर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीस स्थगिती, ७.५ हॉर्सपावरपेक्षा जास्त क्षमतेच्या कृषी पंपांच्या चालू वीजबिलात सवलत, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी आणि रोहयो (MGNREGA) अंतर्गत कामांच्या निकषांत शिथिलता अशा महत्त्वाच्या उपाययोजनांचा समावेश आहे.

ठाणे जिल्ह्याचा समावेश नसल्याने मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील हजारो शेतकरी आणि विद्यार्थी या सर्व शासकीय सवलतींपासून वंचित राहणार आहेत. आधीच निसर्गाच्या लहरीपणामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना या निर्णयामुळे मोठा धक्का बसला आहे. राज्य शासनाने या निर्णयाचा फेरविचार करून मुरबाड आणि शहापूर तालुक्यांचा तातडीने दुष्काळग्रस्त यादीत समावेश करावा, अशी जोरदार मागणी स्थानिक शेतकरी व शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

माननीय आमदार किसन जी कथोरे साहेब यांनी मुरबाड तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या वतीने दुष्काळ जाहीर करावा या साठी मुख्य मंत्री यांच्या कडे सविस्तर निवेदन दिलेले असताना देखील दुष्काळ जाहीर करण्यात आलेला नाही. ही खेदाची बाब

आहे, शासनाने आता तरी शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. आमदार किसनजी कथोरे साहेबांची मागणी रास्त आहे व ती मागणी मान्य करावी.

— Kashinath Desale, ठाणे

अपराध

नाशिकच्या TCS धर्मांतर व लैंगिक छळ प्रकरणात इम्तियाज जलील यांना ५०,००० रुपयांच्या जामिनावर रिलीझ



नाशिक शहरातील TCS धर्मांतर व लैंगिक छळ प्रकरणात महाराष्ट्रातील मुस्लिम इंटेग्रेटेड मोशन (MIM) नेते इम्तियाज जलील यांना ५०,००० रुपयांच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर झाली, असे स्थानिक न्यायालयाने ठरवले.

जामीन मिळाल्यानंतर जलील यांनी पहिली प्रतिक्रिया दिली, परंतु त्यांची टिप्पणी सार्वजनिकपणे उपलब्ध नाही.

या प्रकरणात त्यांच्यावर निदा खानला आश्रय दिल्याचा आरोपही लावला गेला आहे.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq, नासिक

जीवनशैली

जनभागीदारीतून जलक्रांती, जलयुक्त शिवार 3.0 द्वारे जलसमृद्ध महाराष्ट्राची निर्मिती!



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

नीड २४न्यूज महाराष्ट्र

(:विशेष वार्ता पत्र)दिनांक २०/११/२०२६.

मुंबई:ठाणे, दि २० केंद्रीय मंत्री सी आर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली (ऑनलाइन) व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई येथे 'जलसंचय जनभागीदारी : कॅच द रेन 2026 (सीटीआर)'च्या प्रगतीसंदर्भात आढावा बैठक पार पडली.

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवून भूजल पातळी वाढविणे, जुन्या जलसंधारण संरचनांचे पुनरुज्जीवन करणे आणि नव्या संरचनांची निर्मिती करणे, यासाठी राज्य शासनाने व्यापक कृती आराखडा तयार केला आहे. केंद्र शासनाच्या 'जलसंचय : जनभागीदारी अभियानांतर्गत' राज्यात मे 2027 पर्यंत 34,83,940 भूजल पुनर्भरण संरचनांची निर्मिती पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आणि निश्चित उद्दिष्टानुसार काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, एल निनोच्या प्रभावामुळे महाराष्ट्रासमोर दुष्काळाचे मोठे संकट निर्माण झाले आहे. राज्यातील जवळपास 90% भाग दुष्काळाच्या झळा सोसत असून, पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. आगामी काळात पिण्याच्या पाण्याची मागणी वाढण्याची शक्यता आहे. या संकटाचे संधीत रूपांतर करण्याच्या दृष्टीने जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देण्यात येत आहे. जुन्या जलसाठ्यांचे पुनरुज्जीवन, तलावांची दुरुस्ती, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यावर विशेष भर देण्यात येत आहे.

जलयुक्त शिवार 3.0 ची 18,000 गावांत अंमलबजावणी

राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी जलयुक्त शिवार योजना तिसऱ्या टप्प्यात राबविण्यात येणार असून, त्यासाठी 18,000 गावांची निवड करण्यात आली आहे. जलयुक्त शिवार 3.0, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, मनरेगा तसेच इतर योजनांमधील निधी आणि कामांचे एकत्रीकरण करून जलसंधारणाची कामे अधिक प्रभावीपणे राबविण्यात येतील. या कामांचे शास्त्रीय पद्धतीने नियोजन, मॅपिंग आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारणाच्या कामांसाठी ग्रामविकास, वन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, कृषी आणि पाणीपुरवठा विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे. वन विभागामार्फत वनबंधारे आणि वनतळ्यांची निर्मिती, तसेच सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागामार्फत खासगी घरे तसेच शासकीय इमारतींवर छतावरील पावसाचे पाणी साठविण्याच्या (रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग) उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. याशिवाय, पावसाळ्यात वाहणाऱ्या आणि उर्वरित काळात कोरड्या राहणाऱ्या 50 किलोमीटर किंवा त्यापेक्षा अधिक लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

जलसंधारणासाठी केंद्र सरकारकडे विशेष निधीची मागणी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, तलावांचे पुनरुज्जीवन, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली आहे. प्रचलित निकषांच्या पलीकडे जाऊन केंद्र सरकारने राज्याला ही मदत करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

जल जीवन मिशनच्या कामांना गती देणार

कामांसाठी ग्रामविकास, वन, सार्वजनिक बांधकाम, नगरविकास, कृषी आणि पाणीपुरवठा विभागांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. जिल्ह्यांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सर्व विभागांनी एकत्रितपणे काम करावे. वन विभागामार्फत वनबंधारे आणि वनतळ्यांची निर्मिती, तसेच सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागामार्फत खासगी घरे तसेच शासकीय इमारतींवर छतावरील पावसाचे पाणी साठविण्याच्या (रूफटॉप रेनवॉटर हार्वेस्टिंग) उपाययोजना राबविण्यात येणार आहेत. याशिवाय, पावसाळ्यात वाहणाऱ्या आणि उर्वरित काळात कोरड्या राहणाऱ्या 50 किलोमीटर किंवा त्यापेक्षा अधिक लांबीच्या नद्यांचे पुनरुज्जीवन करण्याचे कामही सुरू करण्यात आले आहे.

जलसंधारणासाठी केंद्र सरकारकडे विशेष निधीची मागणी

राज्यातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर विद्यमान जलसंधारण संरचनांची दुरुस्ती, तलावांचे पुनरुज्जीवन, शेततळी आणि पुनर्भरण खड्ड्यांची निर्मिती यासाठी केंद्र सरकारकडे विशेष आर्थिक मदतीची मागणी करण्यात आली आहे. प्रचलित निकषांच्या पलीकडे जाऊन केंद्र सरकारने राज्याला ही मदत करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

जल जीवन मिशनच्या कामांना गती देणार

जल जीवन मिशनअंतर्गत निधी खर्चाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमी असल्याचे निदर्शनास आले आहे. डिसेंबरपर्यंत निधी विनियोगाचे प्रमाण 50% पर्यंत नेण्याच्या दृष्टीने आवश्यक सूचना देण्यात येतील. तसेच योजनेची शाश्वतता राखण्यासाठी पाण्याचा खात्रीशीर स्रोत आणि वीजबिल भरणा या दोन महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

जल जीवन मिशनची कामे पूर्ण करण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाने एकत्रितपणे राज्यनिहाय अडचणींचा अभ्यास करून उपाययोजना निश्चित कराव्यात. प्रत्येक राज्याच्या अडचणी वेगळ्या असल्याने एकच उपाय सर्व राज्यांना लागू होऊ शकत नाही यासाठी केंद्र व राज्य अधिकाऱ्यांची विशेष बैठक घेऊन निधी, संसाधने आणि कामांचे नियोजन करण्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

जलसंधारणाच्या कामांमध्ये लोकप्रतिनिधींच्या स्थानिक विकास निधीचाही उपयोग वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येईल. राज्यस्तरावर जलसंधारण पुरस्कार आणि स्पर्धांचे आयोजन करून गावांमध्ये सकारात्मक स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे. यापूर्वी जलयुक्त शिवार आणि वॉटर कपसारख्या उपक्रमांमुळे गावागावांत मोठ्या प्रमाणावर लोकसहभाग मिळाला आहे. याच धर्तीवर जलसंचय अभियानातही लोकसहभाग वाढविण्यात येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

जलसंचय अभियानांतर्गत निश्चित करण्यात आलेली उद्दिष्टे मे 2027 पर्यंत पूर्ण करण्याची राज्य शासनाची जबाबदारी असून, या कामांचा मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव आणि संबंधित विभागांच्या स्तरावर नियमित आढावा घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी नमूद केले.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री डॉ. राजभूषण चौधरी (ऑनलाइन) व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

भोंगवलीत शासनाचा बंधारा बुजवल्याचा आरोप; पुणे ट्रान्समिशन कंपनीवर कारवाई होणार का? बाळासाहेब शेडगे यांची कृषी विभागाकडे तक्रार;



कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांच्याकडून प्रत्यक्ष स्थळ पाहणी, बंधारा आढळला नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

तालुक्यातील भोंगवली येथे गट क्रमांक १९३ आणि १९९ मधील शासनाने बांधलेला बंधारा पुणे ट्रान्समिशन कंपनीने कोणतीही आवश्यक परवानगी न घेता बुजवल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांचे तसेच वन्यजीवांचे मोठे नुकसान झाल्याची तक्रार करण्यात आली असून, संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

या प्रकरणी बाळासाहेब शेडगे यांनी कृषी विभागाकडे अधिकृत तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आज, दि. १७ नोव्हेंबर रोजी कृषी अधिकारी शरद धर्माधिकारी यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन स्थळ पाहणी केली. या पाहणीदरम्यान त्यांनाही संबंधित ठिकाणी बंधारा आढळून आला नसल्याचे सांगण्यात आले.

शासनाच्या माध्यमातून उभारण्यात आलेला बंधारा नेमका कोणी आणि कोणत्या परवानगीच्या आधारे बुजवला? यासाठी संबंधित विभागाची मंजुरी घेण्यात आली होती का? तसेच बंधारा बुजवल्यामुळे परिसरातील शेती, पाणीसाठा आणि वन्यजीवांवर झालेल्या परिणामांची जबाबदारी कोण घेणार? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.

बंधाऱ्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना पाण्याचा आधार मिळत होता. मात्र, तो बुजवण्यात आल्यामुळे आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता असून, वन्यजीवांच्या पाण्याच्या उपलब्धतेवरही परिणाम झाल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, या परिसरातील जमीन, उत्खनन आणि औद्योगिक कामांबाबत यापूर्वीही अनेक तक्रारी करण्यात आल्या आहेत. आता शासनाच्या बंधाऱ्याचा विषय समोर आल्याने प्रशासनाने या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करावी, अशी मागणी होत आहे.

शासनाचा बंधारा बुजवणाऱ्यांना अभय कोणाचे?

सामान्य नागरिकांनी शासनाच्या मालमत्तेचे नुकसान केले तर त्यांच्यावर तातडीने कारवाई होते; मग शासनानेच बांधलेला बंधारा बुजवण्याचा प्रकार घडला असेल, तर संबंधितांवर कारवाई करण्यास प्रशासनाला अडचण काय? असा सवाल स्थानिक नागरिक उपस्थित करत आहेत.

आता कृषी विभागाच्या स्थळ पाहणीनंतर पुढे कोणती कार्यवाही होते, महसूल विभाग आणि संबंधित यंत्रणा या प्रकरणाची चौकशी करतात का आणि शासनाच्या बंधाऱ्याचे नुकसान करणाऱ्यांवर प्रत्यक्ष कारवाई होते का, याकडे भोंगवली ग्रामस्थांसह परिसरातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

— किरण सदाशिव आंबिके

स्थानीय

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरातील श्री क्षेत्रात पाहणी दौरा केला



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्तिकी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरातील श्री क्षेत्रात पाहणी दौरा केला.

या दिवशी त्यांनी स्थानिक पायाभूत सुविधा आणि धार्मिक स्थळांची स्थिती तपासली.

पंढरपूरातील या पाहणी दौऱ्याने राज्याच्या विकास योजनांच्या अंमलबजावणीबद्दल अधिक स्पष्टता मिळाली.

— Suhas Tagare

शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्याने फाडले बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो, चंद्रपुरात निषेध आंदोलन



शिवसेना प्रमुख हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचा पत्रकार परिषदेत शिवसेना शिंदे गटाच्या प्रवक्त्या शायना एनसी यांनी फोटो फाडून त्यांचा घोर अपमान केल्याच्या संतापजनक घटनेचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत आहेत.

बाळासाहेबांच्या अस्मितेवर झालेल्या या आघाताविरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने राज्यभर आक्रमक पवित्रा घेत निषेध आंदोलनाचे रणशिंग फुंकले आहे. याचाच भाग म्हणून चंद्रपुरात युवासेना प्रमुख आदित्य साहेब ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेना युवासेना सचिव वरून सरदेसाई साहेब युवासेना कार्यकारणी सदस्य हर्षल दादा काकडे युवांसेना महाराष्ट्र राज्य विस्तारक संदीप रियाल पटेल यांच्या मार्गदर्शनात युवासेना जिल्हाप्रमुख विक्रांत सहारे यांच्या नेतृत्वात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत आक्रमक निषेध आंदोलन करण्यात आले.

मुंबईत आयोजित शिंदे गटाच्या पत्रकार परिषदेत शायना एनसी यांनी सर्वांसमोर बाळासाहेब ठाकरे यांचा फोटो फाडून तमाम शिवसैनिकांच्या भावना दुखावल्याचा आणि आमच्या दैवताचा अवमान केल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. ज्या बाळासाहेबांच्या नावावर हे सत्ता आणि राजकारण उपभोगत आहेत, त्याच बाळासाहेबांचा असा जाहीर अपमान करणाऱ्या गटातील प्रवक्त्याला लाज वाटली पाहिजे, असा घणाघाती हल्लाबोल विक्रांत सहारे यांनी केला.

बाळासाहेबांचा हा अवमान कदापि सहन केला जाणार नाही; शायना एनसी यांनी तत्काळ जाहीर माफी मागावी, अन्यथा त्यांना आम्ही महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा थेट इशाराही सहारे यांनी दिला. आंदोलनादरम्यान संतप्त शिवसैनिकांनी शायना एनसी यांच्या प्रतिमेला जोडे मारत आपला तीव्र संताप व निषेध व्यक्त केला.

— Jitendra Govinda Ade

राज्यातील दुष्काळी तालुक्यांमध्ये 'VB-G RAM G' योजनेतून जलसंधारणाला वेग; आता मिळणार १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी!



‘आपले गाव, आपले नियोजन’ उपक्रमांतर्गत पाणीटंचाईवर मात करण्यासाठी ग्रामस्थांना सहभागाचे आवाहन

नीड २४ न्यूज महाराष्ट्र / मुंबई (प्रतिनिधी):

जिल्हा प्रतिनिधी: काशिनाथ देसले | तालुका प्रतिनिधी: किशोर पवार

महाराष्ट्र शासनाने राज्यातील ३५८ पैकी सुमारे ३१० तालुक्यांमध्ये (८६ टक्के भाग) दुष्काळ जाहीर केला असून, या संकटावर मात करण्यासाठी शासन स्तरावर मोठ्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून महाराष्ट्र रोजगार हमी योजना विभागाच्या वतीने ‘विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण)’ अर्थात VB-G RAM G योजनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू झाली आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यातील दुष्काळी व पाणीटंचाईग्रस्त भागातील अकुशल कामगारांना वर्षभरात आता १०० ऐवजी १२५ दिवसांच्या हमखास रोजगाराची हमी मिळणार आहे.

दुष्काळी भागासाठी 'आपले गाव, आपले नियोजन' ठरणार वरदान:

"आपले गाव, आपले नियोजन!". राज्यातील मराठवाडा, विदर्भ, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातील वाडा, विक्रमगड, श्रीवर्धन यांसारख्या दुष्काळी तालुक्यांतील अनेक गावे व वाड्या-वस्त्यांना दरवर्षी तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर, प्रत्येक गावाच्या पाण्याच्या आणि विकासाच्या गरजेनुसार आराखडा स्वतः ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत मिळून तयार करणार आहेत. लोकसहभागातून नियोजन केल्यामुळे दुष्काळी भागात कायमस्वरूपी जलस्त्रोत निर्माण करणे सोपे होणार आहे.

योजनेअंतर्गत समाविष्ट असलेली प्रमुख कामे:

• जलसंधारण व गाळ काढणे: दुष्काळी भागातील भूजल पातळी वाढवण्यासाठी शेततळी, पाझर तलाव, वनराई व सिमेंट बंधारे तसेच तलावातील गाळ काढण्याच्या कामांना विशेष प्राधान्य दिले जात आहे.

• चारा लागवड व उपजीविका: दुष्काळी परिस्थितीत जनावरांना चारा मिळावा यासाठी या योजनेतून मका आणि ज्वारीच्या चारा लागवडीला चालना देण्यात येत असून, फळबाग लागवड व गुरांच्या गोठ्यांसाठीही लाभ दिला जात आहे.

• ग्रामीण पायाभूत सुविधा: गावातील अंतर्गत रस्ते, गटारे आणि सार्वजनिक मालमत्तांची उभारणी.

मजुरांचे स्थलांतर थांबणार:

राज्यातील दुष्काळी व ग्रामीण भागातील मजुरांचे उन्हाळ्यात रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबवून त्यांना गावातच सन्मानाचा रोजगार मिळावा आणि गावे टंचाईमुक्त व स्वयंपूर्ण व्हावीत, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. तसेच शासनाने दुष्काळी भागासाठी जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, वीजबिलात सवलत आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा यांसारख्या सवलतीही लागू केल्या आहेत.

तरी राज्यातील दुष्काळी भागातील सर्व नागरिक, शेतकरी आणि मजुरांनी VB-G RAM G योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व ग्रामसभेत सहभागी होऊन आपल्या गावाच्या जलसंधारणाचा व विकासाचा आराखडा ठरवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

उमरीच्या मामा चौकाचे नाव बदलून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक करणे



उमरी शहरातील मामा चौकाचे नाव बदलून परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक करणे हा प्रस्ताव नगरपरिषदेसमोर तीन वेळा सादर केला गेला आहे. तथापि, या तीन प्रस्तावांनंतरही चौकाचे नाव बदलले गेले नाही, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये असंतोष वाढला आहे.

निवेदनकर्त्यांनी नगरपरिषदेवर त्वरित लक्ष देण्याची आणि तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. त्यांनी सूचित केले आहे की, जर यावर त्वरित कारवाई झाली नाही तर उमरी शहरात पुढील काळात नगरपरिषदेवर अमरण उपोषणाचा प्रश्न उभा राहू शकतो.

या परिस्थितीला स्थानिक प्रशासनाने गंभीरतेने घेऊन, नाव बदलण्याच्या प्रक्रियेची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त केले आहे. नगरपरिषदेची कार्यवाही लवकरात लवकर होण्याची अपेक्षा आहे.

— Gangadhar Prakash Gangasagare

दुष्काळाचे सावट असताना नीरा उजव्या कालव्याला गळती; लाखो लिटर पाणी वाया! पाण्याचा अपव्यय रोखण्यात पाटबंधारे विभाग अपयशी? शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान व शेती नपिक होण्याची भीती



भोर, पुणे :

राज्यभर दुष्काळाचे सावट निर्माण झालेले असताना पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातून वाहणाऱ्या नीरा नदीपात्रात पाण्याचे आवर्तन सोडण्यात आले आहे. मात्र, एकीकडे पाण्याची टंचाई आणि दुसरीकडे पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत असल्याचे चित्र नीरा उजव्या कालव्याच्या गळतीमुळे समोर येत आहे.

नीरा उजव्या कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली आहेत. त्यामुळे कालव्याला ठिकठिकाणी गळती लागली असून, लाखो लिटर पाणी वाया जात असल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे कालव्यातून वाहणारे पाणी केवळ शेतकऱ्यांच्या शेतातच नव्हे, तर रस्त्यावरही वाहून जात असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होत आहे.

एकीकडे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाण्याची प्रतीक्षा करावी लागत असताना दुसरीकडे कालव्याच्या गळतीमुळे उपलब्ध पाणी वाया जात आहे. या गळतीचा फटका कालव्यालगतच्या त्यांच्या शेतातील भात पिकांचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. याबरोबर शेतामध्ये हे पाणी साचून राहत असल्यानं शेकडो एकर शेती नापीक होण्याची भीती शेतकरी व्यक्त करतायत.पाठबंधारे विभागाने कालव्याचे सिमेंट काँक्रीटीकरणं करून अस्तरीकरणं करावे आणि गळती थांबवावी अशी मागणी शेतकरी करतायत. कालव्याच्या अस्तरीकरणाची कामे रखडलेली असताना पाटबंधारे विभागाकडून याकडे गांभीर्याने लक्ष दिले जात आहे का? पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी विभागाकडून नेमक्या कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत. दुष्काळसदृश परिस्थितीत पाण्याचा प्रत्येक थेंब महत्त्वाचा असताना कालव्यामधून होणारी गळती रोखण्याची जबाबदारी पाटबंधारे विभागाची नाही का? असा सवाल नागरिक आणि शेतकरी उपस्थित करत आहेत.

पाटबंधारे विभागाने तातडीने कालव्याची पाहणी करून गळती रोखावी, रखडलेली अस्तरीकरणाची कामे पूर्ण करावीत आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांची पाहणी करून योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

आता या गंभीर प्रकाराची पाटबंधारे विभाग किती गांभीर्याने दखल घेणार आणि पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी कोणती ठोस कारवाई करणार, याकडे भोर तालुक्यातील शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

— किरण सदाशिव आंबिके

अपराध

शिरोशी ग्रामपंचायतीतील १४ लाखांच्या गैरव्यवहारप्रकरणी ग्रामविकास अधिकारी निलंबित; सरपंचांच्या कारभाराचीही होणार चौकशी



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक २०/११/२०२६

विशेष वार्ता पत्र

ठाणे जिल्हा, तालुका मुरबाड (प्रतिनिधी) :

ग्रामपंचायतीमध्ये झालेल्या कथित आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी ठाणे जिल्हा परिषद प्रशासनाने मोठी कारवाई केली आहे. ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण घायवट यांना तात्काळ निलंबित करण्यात आले असून, ग्रामपंचायतीच्या सरपंच शोभा मुकणे यांच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याचे आदेश ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मंगळवारी (ता. १७) दिले आहेत. प्रशासनाच्या या ठोस कारवाईनंतर उपसरपंच शेखर देशमुख यांनी सुरू केलेले उपोषण मागे घेतले आहे.

नेमके प्रकरण काय?

शिरोशी ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण घायवट यांनी पदाचा गैरवापर करून विविध प्रकारचे गैरव्यवहार केल्याचा आरोप उपसरपंच शेखर देशमुख यांनी केला होता. सरपंच शोभा मुकणे आणि ग्रामविकास अधिकारी घायवट यांनी संगनमत करून ग्रामपंचायतीच्या निधीत तब्बल १४ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याचा गंभीर दावा देशमुख यांनी आपल्या तक्रारीत केला होता.

उपोषणानंतर प्रशासनाला जाग

या भ्रष्टाचाराविरोधात आणि सरपंच मुकणे यांच्या कारभाराची चौकशी व्हावी, या मागणीसाठी उपसरपंच शेखर देशमुख यांनी प्रशासनाकडे वारंवार लेखी तक्रारी केल्या होत्या. मात्र, त्यावर कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने अखेर त्यांनी आक्रमक पवित्रा घेत मंगळवारी ठाणे जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर बेमुदत उपोषण सुरू केले होते.

उपसरपंचांच्या या आंदोलनाची जिल्हा परिषद प्रशासनाने तात्काळ दखल घेतली. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामविकास अधिकारी लक्ष्मण घायवट यांच्या निलंबनाचे आदेश काढले आणि सरपंचांच्या कारभाराची चौकशी सुरू केली. न्याय मिळाल्याने आणि प्रशासनाने कारवाईचे पाऊल उचलल्याने शेखर देशमुख यांनी आपले आंदोलन मागे घेतले आहे. या कारवाईमुळे मुरबाड तालुक्यातील ग्रामपंचायत वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

चिकलठाणमध्ये उजनी वाचवण्यासाठी दशक्रिया विधी; मच्छिमार-शेतकऱ्यांनी ए आय डेटा सेंटरविरुद्ध एल्गार केला



चिकलठाण, ता. करमाळा | प्रतिनिधी

उजनी धरण परिसरात प्रस्तावित ए आय डेटा सेंटर व सोलर प्रकल्पाच्या विरोधात आज बुधवार, दि. १९ नोव्हेंबर रोजी चिकलठाण (ता. करमाळा) येथे आगळ्यावेगळ्या पद्धतीने निषेध करण्यात आला.

कोटलिंगनाथ मंदिर परिसरात सकाळी १० वाजता मच्छिमार बांधव, शेतकरी व ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने एकत्र येत या विनाशकारी प्रकल्पाच्या विरोधात दशक्रिया विधी (दहावा) केला. या विधीद्वारे प्रकल्पाला पाठिंबा देणाऱ्या विचारांचा आणि अधिकाऱ्यांच्या भूमिकेचा प्रतीकात्मक निषेध करण्यात आला.

गेल्या काही आठवड्यांपासून उजनी परिसरात या प्रकल्पाविरोधात जनजागृती बैठका, ग्रामसभा, रस्ता रोको आंदोलने सुरू आहेत. शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, उजनीचे पाणी हे शेती आणि पिण्यासाठी आहे, डेटा सेंटरच्या कूलिंगसाठी नाही. तर मच्छिमार बांधवांचे म्हणणे आहे की, धरणातील पाण्यावर आणि मासेमारीवर त्यांचा उदरनिर्वाह अवलंबून आहे, प्रकल्प आल्यास त्यांचे अस्तित्व धोक्यात येईल.

या आंदोलनात चिकलठाणसह परिसरातील अनेक गावांतील मच्छिमार, शेतकरी, महिला व तरुण मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. “उजनी वाचवा, भविष्य वाचवा”, “उजनीचे पाणी शेतीसाठी, ए आय सेंटरला विरोध जनहितासाठी” अशा घोषणा यावेळी देण्यात आल्या. ०.५ टीएमसी पाणी लागणार असल्याचे म्हटले आहे, तर आंदोलकांनी पाण्याच्या वापरावरून आणि जमीन अधिग्रहणावरून चिंता व्यक्त केली आहे. आंदोलनानंतरही प्रकल्प रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा यावेळी मच्छिमार कृती समिती व शेतकरी संघटनांनी दिला आहे.

— रीपोर्टर दिलीप नगरे

राजनीति

दादर रेल्वे स्थानकाचे नाव 'चैत्यभूमी' करण्याच्या घोषणेवरून राज ठाकरे यांना वाद

दादर रेल्वे स्थानकाचे नाव बदलून 'चैत्यभूमी रेल्वे स्थानक' करण्याची घोषणा झाल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयामुळे दादर आणि चैत्यभूमी या दोन ठिकाणांमधील नावांतराच्या चर्चेवरून वाद निर्माण झाला आहे.

या घोषणेवरून राज ठाकरे यांना तीव्र निषेध झाला आहे. जातीयवादी राज ठाकरे यांना 'झोंबल्या मिरच्या' अशा शब्दांत या घटनेवरून टीकास्त्र सोडले जात आहे. नावांतराच्या प्रक्रियेवरून सध्या राजकीय वादग्रस्त वातावरण आहे.

दादर ते चैत्यभूमी अशा या नामांतराच्या चर्चेमुळे स्थानिक नागरिकांसह राजकीय पक्षकारांमध्येही संभ्रम निर्माण झाला आहे. या निर्णयामागील कारणे आणि त्याचा परिणाम याबाबत सध्या चर्चेला उधाण आले आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL), मुंबई

भोईर कुटुंबाचे आमरण उपोषण अखेर तात्पुरते स्थगित; प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर १३ व्या दिवशी निर्णय.



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

ठाणे मुरबाड (प्रतिनिधी): विशेष वृत्त

शहापूर-मुरबाड तालुक्यातील शाई येथील अनंता दत्तू भोईर यांनी आपल्या न्याय्य मागण्यांसाठी मुरबाड तहसील कार्यालयाबाहेर सुरू केलेले आमरण उपोषण अखेर १३ व्या दिवशी तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. उपोषणादरम्यान अनंता भोईर यांची प्रकृती खालावल्याने आणि प्रशासनाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी त्रिसदस्यीय समिती नेमण्याचे आश्वासन दिल्याने हा निर्णय घेण्यात आला.

नेमके प्रकरण काय?

अनंता दत्तू भोईर यांनी ५ नोव्हेंबरपासून मुरबाड तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले होते. गेल्या १३ दिवसांत वनविभाग, महसूल विभाग, पोलीस प्रशासन आणि उपोषणकर्ते यांच्यात अनेकदा चर्चेच्या फेऱ्या झाल्या; मात्र त्यातून कोणताही ठोस तोडगा निघाला नव्हता. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे १७ नोव्हेंबर रोजी समाजबांधवांच्या वतीने तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला होता.

त्रिसदस्यीय समितीची स्थापना

आंदोलनाचा वाढता दबाव आणि अनंता भोईर यांची बिघडलेली प्रकृती लक्षात घेता, तहसीलदार अभिजीत देशमुख यांच्या दालनात तातडीची बैठक पार पडली. या बैठकीला वनविभाग, महसूल विभागाचे अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. सखोल चर्चेअंती या संपूर्ण प्रकरणाची नि:पक्षपाती चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

ही समिती आगामी १५ दिवसांत संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून आपला अहवाल सादर करणार आहे. प्रशासनाने दिलेल्या या ठोस आश्वासनानंतर भोईर कुटुंबाने आपले उपोषण तात्पुरते मागे घेतले असून, आता या समितीच्या अहवालाकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

संचालक मंडळाची निवड बिनविरोध; 10 संचालकांच्या निवडीवर शिक्कामोर्तब



सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक च्या संचालकपदाच्या निवडणुकीत 10 संचालकांची बिनविरोध निवड झाल्याने सहकार क्षेत्रात महत्त्वपूर्ण घडामोड घडली आहे. निवडणुकीत संबंधित उमेदवारांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांच्या नेतृत्वावर आणि सहकार क्षेत्रातील कार्यावर विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

संचालकपदी बिनविरोध निवड झालेल्यांमध्ये आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राजा भाऊ राऊत, प्रशांत (मालक) परिचारक, बालकृष्ण पाटील, अजिंक्यराणा पाटील, पृथ्वीराज माने, सिद्धेश्वर अवताडे, रायतन शिंदे, श्रीपाद हसापूर आणि संभाजी जगताप यांचा समावेश आहे.

या बिनविरोध निवडीमुळे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळात नव्या नेतृत्वाला संधी मिळाली असून, जिल्ह्यातील सहकार क्षेत्राच्या विकासासाठी सर्व संचालक एकत्रितपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शेतकरी, सहकारी संस्था, सभासद आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेशी संबंधित विविध प्रश्न सोडविण्यासाठी बँकेच्या माध्यमातून प्रभावी कार्य होईल, अशी आशा सहकार क्षेत्रातून व्यक्त केली जात आहे.

सर्व नवनिर्वाचित संचालकांचे विविध स्तरांतून अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

सहकार क्षेत्रात विश्वासाचा विजय... नेतृत्वावर शिक्कामोर्तब!

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी बिनविरोध निवड झालेल्या सर्व संचालकांचे मन:पूर्वक अभिनंदन!

— YALLAPPA RAGATE (PATIL)

स्थानीय

पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सूर्यकांत किंद्रे यांचे बिनविरोध निवड



भोर : पुणे जिल्हा पत्रकार संघाच्या दक्षिण विभाग अध्यक्षपदी भोरच्या सूर्यकांत पांडुरंग किंद्रे (रा. रायरी) मा. भोर तालुका अध्यक्ष यांची बिनविरोध निवड करण्यात आली. अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष शिवराज काटकर यांनी नवीन जिल्हा कार्यकारिणीची घोषणा केली. या निवडीमुळे भोर तालुका पत्रकार संघाला जिल्हा संघावर मानाचे स्थान प्राप्त झाले आहे.

नवनियुक्त कार्यकारिणीत इंदापूर-बारामती येथील राजकुमार थोरात आणि पुरंदरचे प्रकाश फाळके यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.. दौडचे जीवन शेंडकर हे सरचिटणीस म्हणून काम पाहतील.. कोषाध्यक्ष म्हणून मुळशी येथील विनोद मांझिरे काम पाहतील.. जिल्हा प्रतोद म्हणून बंडू दातीर कार्यभार सांभाळतील..

फेरनियुक्ती करण्यात आली आहे तर राजेंद्र गवळी आणि दत्तात्रय भोंगळे यांना परिषदेच्या राज्य कार्यकारिणीचे सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. याबद्दल सूर्यकांत किंद्रे यांची भोर तालुक्यातुन विविध संघटना आणि पदाधिकाऱ्यांकडून सत्कार आणि कौतुक करण्यात येत आहे याच पार्श्वभूमीवार आज भोर तालुका पत्रकार संघातर्फे त्याचा सत्कार करण्यात आला याबरोबर अध्यक्ष सूर्यकांत किंद्रे यांनीही बोलताना आपण जिल्ह्याची जबाबदारी निष्पक्ष आणि काटेकोरपणे पार पाडणार असून पत्रकार संघासाठी सदस्य वाढवीण्याची जबाबदारी आणि भोर तालुका पत्रकार संघासाठी पत्रकार भवन उपलब्ध करून देण्यासाठी पूर्ण प्रयत्न करणार असून सर्वांना बरोबर घेऊन व सर्वांच्या अडचणींना पाठीशी उभे राहन्याची खात्री दिली. कार्यक्रमात जेष्ठ पत्रकार ढवळे सर यांनी निवेदक म्हणून सुंदर असे प्रास्ताविक केले. यावेळी भोर तालुका पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

— किरण सदाशिव आंबिके

अपराध

ठाण्याचे पोलीस आयुक्त आशितोष डुंबरे यांचे व्हॉट्सअॅप खाते हॅक, व्हिडिओ प्रसारित



ठाण्याचे पोलीस आयुक्त श्री आशितोष डुंबरे यांचे व्हॉट्सअॅप खाते सायबर गुन्हेगारांच्या निशाण्यावर आले आणि खाते हॅक करून त्यातून एक व्हिडिओ सार्वजनिक केला गेला. हा प्रसंग स्थानिक माध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चा झाला आणि त्वरित पोलिस विभागाने तपास सुरू केला.

या घटनेला अत्यंत गंभीर आणि चिंताजनक मानले जात आहे, कारण वरिष्ठ अधिकाऱ्यांचे डिजिटल खाते सुरक्षित नसल्यास सायबर हल्ल्यांची जोखीम वाढते. सायबर सुरक्षा तज्ञांनीही या प्रकारच्या हॅकिंगला राष्ट्रीय सुरक्षा आणि सार्वजनिक विश्वासावर परिणामकारक मानले आहे.

विशेषत:, जर उच्चस्तरीय अधिकाऱ्यांचे डिजिटल खाते सुरक्षित राहिले नाही तर सामान्य नागरिकांच्या सायबर सुरक्षा हमीची जबाबदारी कोण घेईल, हा प्रश्न उभा राहिला आहे. या बाबतीत त्वरित उपाययोजना आणि सुरक्षा प्रोटोकॉल बळकट करणे आवश्यक आहे.

— Gangadhar Prakash Gangasagare, ठाणे

धर्म

दादर स्थानक होणार आता ‘चैत्यभूमी’!७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त २५ लाख अनुयायांच्या स्वागतासाठी शासन सज्ज; विधिमंडळ अधिवेशनात नामकरणाची प्रक्रिया पूर्ण करणार



७० व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त २५ लाख अनुयायांच्या स्वागतासाठी शासन सज्ज; विधिमंडळ अधिवेशनात नामकरणाची प्रक्रिया पूर्ण करणार

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

मुंबई,ठाणे दि. १९/११/२०२६. (प्रतिनिधी) :विशेष महा निर्वाण दिन वार्ता पत्र

व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबईतील चैत्यभूमी येथे येणाऱ्या लाखो अनुयायांच्या सोयीसुविधांसाठी राज्य शासनाने कंबर कसली आहे. दादर रेल्वे स्थानकाला ‘चैत्यभूमी’ असे नाव देण्यास राज्य सरकारने यापूर्वीच मान्यता दिली असून, केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त होताच विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात नामकरणाची अधिकृत प्रक्रिया पूर्ण केली जाईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

विधानभवनातील मंत्रिमंडळ सभागृहात महापरिनिर्वाण दिन पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी विशेष बैठक पार पडली. यंदा ५ व ६ डिसेंबर रोजी शिवाजी पार्क व चैत्यभूमी परिसरात सुमारे २५ लाख अनुयायी येण्याची शक्यता लक्षात घेता, मागील वर्षांच्या अनुभवातून राहिलेल्या त्रुटी दूर करून सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले.

चोख व्यवस्था आणि कडक नियमावली

अनुयायांसाठी निवारा, आरोग्य सेवा, स्वच्छता, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, अखंडित वीजपुरवठा आणि शौचालयांची पुरेशी व्यवस्था करण्याचे आदेश बृहन्मुंबई महानगरपालिका आणि संबंधित विभागांना देण्यात आले आहेत. महापरिनिर्वाण दिनाचे पावित्र्य व गांभीर्य राखण्यासाठी या दिवशी उत्सवी स्वरूपाचे कार्यक्रम टाळून प्रबोधनपर उपक्रम राबवावेत. तसेच, चैत्यभूमी परिसरात शांतता व शिस्त राखण्यासाठी कोणत्याही प्रकारचे मोर्चे, धरणे किंवा आंदोलनांवर गृह विभागाने अधिकृत बंदी जाहीर करावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. बैठकीत समन्वय समितीने मांडलेल्या सूचनांवर पुढील पाच ते सात दिवसांत कार्यवाही पूर्ण करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

हलगर्जीपणा खपवून घेणार नाही : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

देशभरातून येणाऱ्या लाखों अनुयायांना सन्मानपूर्वक आणि सुलभ सेवा देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. निवारा, भोजन, स्वच्छता आणि सुरक्षेच्या नियोजनात कोणतीही कमतरता राहता कामा नये. सुविधांमध्ये हयगय झाल्यास किंवा कोणताही अनुचित प्रकार घडल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कडक कारवाई केली जाईल, असा सज्जड इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी दिला.

इंदू मिल स्मारकाला निधीची कमतरता भासणार नाही : उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारकाचे बहुतांश काम पूर्ण झाले असून, पुतळ्याचे काही काम अंतिम टप्प्यात आहे. कामाचा खर्च वाढला तरी शासन त्याची भरपाई करेल आणि स्मारकासाठी निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिली. उर्वरित काम गतीने पूर्ण करण्यासाठी पुढील आठवड्यात स्वतंत्र आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मान्यवरांची उपस्थिती

या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह राज्यमंत्री योगेश कदम, माजी मंत्री संजय बनसोडे, महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, भाई गिरकर यांच्यासह वरिष्ठ सचिव, वरिष्ठ पोलीस अधिकारी, मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी आणि भारतीय बौद्ध भिक्खू संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

— Kashinath Desale, ठाणे

भद्रावतीच्या प्रभाग १ मध्ये नगरसेवक महेश जिवतोडे यांचे स्वच्छता अभियान



भद्रावती शहरातील प्रभाग क्रमांक १ मध्ये स्वच्छता मोहिम राबविण्याचा उपक्रम नगरसेवक महेश मारोतराव जिवतोडे यांनी सुरू केला. या मोहिमेचा उद्देश परिसरातील स्वच्छता वाढवून नागरिकांना स्वच्छतेचा सकारात्मक संदेश पोहोचवणे हा होता.

मोहिमेची कार्यवाही नगराध्यक्ष प्रफुल्ल भाऊ चटकी व आरोग्य सभापती रेखाताई खुटेमाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. दोघांच्या सक्रिय सहभागामुळे स्वच्छता अभियानाला गती मिळाली आणि स्थानिक प्रशासनाची जबाबदारी स्पष्ट झाली.

स्वच्छता मोहीमेत छत्रपति नगर, गौतम नगर, बुद्ध विहार व्यायामशाळा परिसर, बाळासाहेब प्रवेशद्वार, देवगडे हॉस्पिटल इत्यादी विविध ठिकाणी स्वच्छता कार्य केले गेले. या ठिकाणी कचरा संकलन, रस्त्यांची स्वच्छता व सार्वजनिक जागांची देखभाल यावर विशेष लक्ष दिले गेले.

मोहिमेचा मुख्य संदेश नागरिकांपर्यंत पोहोचविणे हा होता – स्वच्छता ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. महेश जिवतोडे यांनी या उपक्रमाद्वारे स्वच्छ व सुंदर प्रभाग निर्माण करण्याची वचनबद्धता व्यक्त केली, ज्यामुळे भविष्यातही असेच प्रयत्न सुरू राहतील.

— Jitendra Govinda Ade

देश

कानपूर-दिल्ली वंदे भारत एक्सप्रेस



कानपूर: कानपूर-दिल्ली वंदे भारत एक्सप्रेसमध्ये आपल्या नातेवाईकांना त्यांच्या सीटवर बसण्यास मदत करण्यासाठी चढलेले बारा लोक ट्रेनमध्येच अडकून पडले, कारण ते खाली उतरण्यापूर्वीच ट्रेनचे स्वयंचलित दरवाजे बंद झाले.

या गटाला १३९ किमी दूर इटावापर्यंत नेण्यात आले, जिथे रेल्वे सुरक्षा दलाने (RPF) त्यांना विनातिकीट प्रवास केल्याबद्दल प्रत्येकी ३,००० रुपयांचा दंड आकारला; अशा प्रकारे एकूण ३६,००० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. हे १२ जण कानपूर सेंट्रल स्थानकावर, बनारस ते नवी दिल्ली दरम्यान धावणाऱ्या २२४१५ क्रमांकाच्या ट्रेनमध्ये आपल्या नातेवाईकांना चढण्यास मदत करण्यासाठी शिरले होते. मात्र, ते खाली उतरण्यापूर्वीच ट्रेनचे स्वयंचलित दरवाजे बंद झाले आणि ट्रेन स्थानकावरून रवाना झाली.

आपण बंद दरवाजांच्या चुकीच्या बाजूला आहोत हे लक्षात आल्यावर, त्यांनी रेल्वे कर्मचाऱ्यांशी संपर्क साधून दरवाजे उघडण्याची विनंती केली. मात्र, गाडी धावत असल्यामुळे असे करणे शक्य नव्हते. 'वंदे भारत'चे स्वयंचलित दरवाजे केवळ गाडी निर्धारित स्थानकांवर थांबल्यावरच उघडले जाऊ शकतात आणि ठराविक कालावधीनंतर ते पुन्हा बंद होतात.

या गाडीत अडकलेल्या १२ जणांमध्ये महिला आणि मुलांचाही समावेश होता. या अनपेक्षित प्रवासामुळे प्रवाशांमध्ये घबराट पसरली; काहींनी याला विरोध करत गोंधळही घातला. मात्र, त्यांना उतरवण्यासाठी गाडी मध्येच थांबवता येणे शक्य नव्हते. शेवटी हा गट कानपूरपासून सुमारे १३९ किमी अंतरावर असलेल्या इटावा येथे उतरला. त्यानंतर, वैध तिकिटांशिवाय प्रवास केल्याबद्दल रेल्वे सुरक्षा दलाच्या (RPF) जवानांनी त्यांच्यापैकी प्रत्येकाला ३,००० रुपयांचा दंड आकारला.

स्वास्थ्य

आता आपल्याच गावात मिळणार दृष्टीचे वरदान! टोकावडे ग्रामीण रुग्णालयात १ डिसेंबरपासून मोतीबिंदू शस्त्रक्रियांचा शुभारंभ 'PMJAY' योजनेतून होणार पूर्णपणे मोफत उपचार.



ता. मुरबाड, जि. ठाणे |

प्रतिनिधी :

जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

स्वास्थ्य विशेष वार्ता मुरबाड ठाणे :

मुरबाड तालुक्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातील रुग्णांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि आनंदाची बातमी समोर आली आहे. डोळ्यांच्या विकारांसाठी आणि विशेषतः मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी ग्रामीण भागातील रुग्णांना आता मुंबई किंवा ठाणे येथील मोठ्या रुग्णालयांचे उंबरठे झिजवण्याची गरज भासणार नाही. ग्रामीण रुग्णालय टोकावडे येथे येत्या १ डिसेंबर किंवा ४ डिसेंबरपासून (डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापासून) मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया सुरू करण्यात येणार आहेत. आपल्याच हक्काच्या रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध झाल्याने परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

अत्याधुनिक 'LICA' मायक्रोस्कोप आणि यंत्रसामग्री सज्ज

मोतीबिंदू शस्त्रक्रिया अचूक आणि सुरक्षित व्हावी, यासाठी टोकावडे ग्रामीण रुग्णालयात जगप्रसिद्ध 'LICA' (लायका) कंपनीच्या अत्याधुनिक मायक्रोस्कोपची उभारणी करण्यात आली आहे. या यंत्राचे इन्स्टॉलेशन मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी पूर्ण झाले असून, तज्ज्ञांच्या देखरेखीखाली त्याची चाचणी (टेस्टिंग) देखील यशस्वीरीत्या पार पडली आहे. सध्या केवळ जिल्हा अंधत्व नियंत्रण सोसायटीकडून (District Blindness Control Society) आवश्यक प्रमाणपत्र मिळण्याचा एकच अंतिम टप्पा बाकी आहे. ही औपचारिकता या आठवड्यात पूर्ण होताच प्रत्यक्ष शस्त्रक्रियेचा मार्ग मोकळा होणार आहे.

शासकीय योजनांमधून गोरगरिबांना मोफत उपचार

आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने अनेक ग्रामीण रुग्ण डोळ्यांच्या शस्त्रक्रियेकडे दुर्लक्ष करतात. मात्र, आता टोकावडे ग्रामीण रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना (MJPJAY) आणि प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PMJAY) लागू करण्यात आली आहे. या दोन्ही महत्त्वाकांक्षी शासकीय योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया व नेत्रचिकित्सा पूर्णपणे मोफत केली जाणार आहे.

लोकप्रतिनिधी, प्रशासन आणि सीएसआर (CSR) निधीचा त्रिवेणी संगम

ग्रामीण भागातील सर्वसामान्य रुग्णांना कोणताही आर्थिक खर्च आणि शारीरिक धावपळ न करता दर्जेदार नेत्रचिकित्सा मिळावी, यासाठी रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. नितीन मोकाशी सर यांचा सातत्याने पाठपुरावा व प्रयत्न सुरू होते. त्यांच्या या प्रयत्नांना मुरबाड विधानसभेचे आमदार मा. श्री. किसन कथोरे साहेब यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि विशेष सहकार्य लाभले. तसेच, या संपूर्ण नेत्र निदान व शस्त्रक्रिया सामग्रीसाठी नामांकित औषध निर्माण कंपनी 'SANDOZ LTD. (A Novartis Division)' यांनी आपल्या सीएसआर (CSR) प्रोजेक्टमधून हे अत्याधुनिक साहित्य उपलब्ध करून दिले आहे. या योगदानाबद्दल रुग्णालय प्रशासनातर्फे त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले आहेत.

महत्त्वाच्या वैद्यकीय सुविधा

केवळ नेत्रचिकित्साच नव्हे, तर टोकावडे ग्रामीण रुग्णालयाचा कायापालट होत असून येथे रुग्णांच्या सेवेसाठी खालील महत्त्वाच्या सुविधा एकाच छताखाली उपलब्ध आहेत:

• सोनोग्राफी सुविधा: गरोदर माता व इतर रुग्णांसाठी अचूक निदानाची सोय.

• सामान्य शस्त्रक्रिया: दैनंदिन आणि आवश्यक सर्व प्रकारच्या सामान्य शस्त्रक्रिया.

• लॅप्रोस्कोपिक शस्त्रक्रिया: दुर्बिणीद्वारे केल्या जाणाऱ्या आधुनिक शस्त्रक्रिया.

• गुंतागुंतीच्या जड शस्त्रक्रिया: तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली कठीण शस्त्रक्रियांची सुविधा.

• स्त्रीरोग विभाग: महिलांसाठी विशेष स्त्रीरोग निदान व शस्त्रक्रिया सेवा.

नागरिकांनी तात्काळ नाव नोंदणी करण्याचे आवाहन

ज्या नागरिकांना स्पष्ट दिसायला त्रास होतो, डोळ्यांसमोर धुरकट दिसते, चष्म्याचा नंबर वारंवार बदलतो किंवा डोळ्यांतून सतत पाणी येते, त्यांनी अजिबात विलंब न करता लवकरात लवकर ग्रामीण रुग्णालय टोकावडे येथे भेट द्यावी. रुग्णालयात येऊन डोळ्यांची प्राथमिक तपासणी करून आपली नाव नोंदणी पूर्ण करावी, जेणेकरून १ किंवा ४ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या शस्त्रक्रिया शिबिरात त्यांना प्राधान्याने लाभ घेता येईल. "आपल्या डोळ्यांची काळजी, आता आपल्याच गावात! मोतीबिंदूवर मात करूया, पुन्हा स्वच्छ दिसूया!" असा संदेश देत रुग्णालय प्रशासनाने नागरिकांना या सुविधेचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

घुग्गुस पॉवर प्लांटमध्ये ठेका मजुर हरेंद्र राम यांचा मृत्यू: सुरक्षा प्रश्न उभे



घुग्गुस (चंद्रपूर) येथील लॉयड्स मेटल्सच्या नवीन पॉवर प्लांट प्रकल्पात सोमवारी सकाळी सुमारे १० वाजता वेल्डिंग काम सुरू असताना ठेका मजूर हरेंद्र राम यांचा उंचावरून पडून मृत्यू झाला. मृत्यूची पुष्टी सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी चंद्रपूर शासकीय रुग्णालयात करण्यात आली.

अपघाताच्या वेळी हरेंद्र राम यांनी ऑरेंज रंगाचा ड्युटी ड्रेस परिधान केलेला होता, परंतु शासकीय रुग्णालयातील मॉर्चरीतील व्हायरल छायाचित्रांमध्ये ते फिकट निळ्या शर्टमध्ये दिसत असल्याचे दावे आहेत. तसेच, लॉयड्स मेटल्सच्या HR हेड भूषण सिंह चौहान यांचा व्हिडिओ चर्चेत आला आहे, ज्यात ते 'हे फॅक्ट्रीचं प्रकरण नाहीये ना?' असे म्हणत असल्याचा दावा केला जात आहे.

या घटनेमुळे औद्योगिक सुरक्षा विभाग, कामगार विभाग आणि पोलिस प्रशासनाने संयुक्तपणे निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. CCTV फुटेज, वेल्डिंगची सुरक्षा व्यवस्था, अपघाताची नोंद, रुग्णालयातील कागदपत्रे आणि ड्युटी ड्रेस यांची सखोल तपासणी करणे आवश्यक आहे.

कुटुंबाला न्याय मिळावा आणि अशा अपघातांना टाळण्यासाठी कंपनी व्यवस्थापनाने अधिकृत स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी आहे. दोष आढळल्यास जबाबदार व्यक्तींवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात यावी.

— DOCTOR PINTU PAUL

शहादा तालुक्यातील चिरडे येथे आमदार श्री राजेशदादा पाडवी यांच्या हस्ते नवनिर्मित पुलाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले



शहादा तालुक्यातील चिरडे येथे आमदार श्री राजेशदादा पाडवी यांच्या हस्ते नवनिर्मित पुलाचे लोकार्पण उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले

यावेळी परिसराचे नेते श्री बापूसाहेब दीपकजी पाटील माजी जिल्हा परिषद सभापती सौ कंचनताई पाटील जिल्हा उपाध्यक्ष श्री मकरंद पाटील सरपंच अनुसयाबाई भिल श्री रमेश दादा श्री. लोणखेडा मंडळ अध्यक्ष श्री नितीन पाटील, म्हसावद मंडळ अध्यक्ष श्री विश्वास ठाकरे शहराध्यक्ष श्री जानेश्वर चौधरी संतोष वान्हे नगरसेवक श्री. प्रदीप ठाकरे विनोद जैन दीपक कोळी डॉ. विजय चौधरी सुभाष वाघ सचिन पावरा अनिल पवार यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

— Ashok Patil

अपराध

पतीने पत्नी व दोन्ही मुलांना मारण्याचा कट केला, आत्महत्येची योजना



पोलिसांच्या तपासादरम्यान संशयिताने कबूल केले की त्याने पत्नी व दोन्ही मुलांना मारण्याचा कट केला होता. त्यानंतर स्वतःचा जीव देण्याचा विचारही त्याने केला असल्याचे तो मान्य करतो.

या कबुलीवरून तपास अधिक गतीने सुरू झाला आहे. पोलिसांनी संबंधित प्रकरणाची नोंद घेऊन आवश्यक कायदेशीर कारवाई सुरू केली आहे.

आ

सध्या या घटनेच्या कारणांबाबत आणि संभाव्य प्रेरणांबाबत तपास चालू आहे. तपास अधिकाऱ्यांनी सर्व संबंधित व्यक्तींची चौकशी करून पुरावे गोळा केले आहेत.

पोलिसांनी जनतेला सूचित केले आहे की या प्रकारच्या हिंसक कृत्यांबाबत कोणतीही माहिती असल्यास त्वरित स्थानिक पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

— IMRAN BELIM, औरंगाबाद

जीवनशैली

फाईल अडवल्यास आता थेट शिस्तभंगाची कारवाई!कामात टाळाटाळ करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांना राज्य शासनाचा दणका; उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर सामान्य प्रशासन विभागाचे कडक परिपत्रक जारी



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

ठाणे मुरबाड :नीड २४ न्यूज महाराष्ट्र

दिनांक १९/११/२०२६.

विशेष वार्ता पत्र

मारूनही कामे होत नसल्याचा अनुभव येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांसाठी एक अत्यंत दिलासादायक बातमी आहे. शासकीय कामात जाणीवपूर्वक दिरंगाई करणाऱ्या, नागरिकांना ताटकळत ठेवणाऱ्या आणि महत्त्वाच्या फाईल्स अडवून ठेवणाऱ्या सरकारी अधिकारी व कर्मचाऱ्यांना आता राज्य शासनाने चांगलाच चाप लावला आहे. विहित कालमर्यादेत काम पूर्ण न करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणतीही सबब न ऐकता थेट शिस्तभंगाची कारवाई करण्याचे कडक आदेश महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केले आहेत.

नेमका आदेश आणि पार्श्वभूमी काय?

शासकीय कामकाजात होणाऱ्या विलंबाबाबत मा. उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त करत प्रशासनाला कडक निर्देश दिले होते. या निर्देशांच्या अनुषंगाने शासनाने यापूर्वी ११ सप्टेंबर २०२६ रोजी एक परिपत्रक काढले होते. मात्र, या सूचनांची अधिक प्रभावी आणि परिणामकारक अंमलबजावणी व्हावी, यासाठी सामान्य प्रशासन विभागाने (मंत्रालय, मुंबई) ५ ऑक्टोबर २०२६ रोजी पुन्हा एकदा स्वयंस्पष्ट परिपत्रक (क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ४९/रवका-१) निर्गमित केले आहे.

कायद्याच्या चौकटीत राहून काम करणे बंधनकारक

या परिपत्रकाद्वारे शासनाने २००५ च्या दप्तर दिरंगाई प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. 'महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५' या कायद्याचा आधार घेत प्रशासनातील ढिसाळपणा मोडीत काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

बातमीतील ठळक मुद्दे (हायलाईट्स बॉक्ससाठी):

• कर्तव्याचे बंधन (कलम १०-१): प्रत्येक शासकीय अधिकारी व कर्मचारी आपल्याकडे नेमून दिलेले शासकीय कर्तव्य अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास कायदेशीररीत्या बांधील आहे.

• थेट शिस्तभंगाची कारवाई (कलम १०-२): कोणत्याही ठोस व सबळ कारणाशिवाय फाईल प्रलंबित ठेवल्यास किंवा विहित कालमर्यादेत कार्यवाही न केल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर थेट शिस्तभंगाची कारवाई केली जाणार आहे.

• वरिष्ठांची जबाबदारी: विभाग प्रमुखांनी प्रलंबित फाईल्सचा नियमित आढावा घेणे आणि कामात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कारवाईचा प्रस्ताव सादर करणे आवश्यक राहणार आहे.

• नागरिकांना थेट लाभ: या निर्णयामुळे तहसील, जिल्हाधिकारी कार्यालय, पंचायत समिती आणि मंत्रालयातील अडकून पडणारी सर्वसामान्य नागरिकांची कामे आता वेगाने मार्गी लागणार आहेत.

प्रशासनात शिस्त येण्याची अपेक्षा

अनेकदा किरकोळ त्रुटी काढून किंवा जाणीवपूर्वक फाईल्सवर सही न करता त्या महिनोन्महिने प्रलंबित ठेवल्या जातात. यामुळे सर्वसामान्यांचे आर्थिक आणि मानसिक नुकसान होते. आता उच्च न्यायालयाचा दबाव आणि शासनाच्या या कडक परिपत्रकामुळे सरकारी बाबूंच्या कार्यपद्धतीत सुधारणा होऊन प्रशासनात पारदर्शकता आणि गतिमानता येईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

— Kashinath Desale, ठाणे